Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN : 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume -6 | Issue - 2 | March - 2016

# नरहर कुरुंदकर यांचे मुस्लिमविषयक चिंतन : एक पुनर्शोध



प्रकाश घनशाम कांबळे
कला, वाणिज्य व गृहविज्ञान ,महिला महाविद्यालय, जळगाव.

## प्रास्ताविक-

वर्तमान काळामध्ये मुस्लीम धर्मियांची संख्या २० टक्के झाली आहे. त्यामुळे हा विषय सहजासहजी दुर्लक्षीत करण्यासारखा नाही. नव्हे; इस्लामच्या बाबतीत घडलेल्या एका अभूतपूर्ण घटनेचा याठिकाणी आवर्जून उल्लेख केला पाहिजे ती घटना म्हणजे, ''इस्लामच्या उदयापासून जगाची वाटणी इस्लामी जग आणि इस्लामेत्तर जग श्रद्धावंत (इमान) आणि अश्रद्ध (क्रूर) अशी करण्यात आलेली आहे.''[१] म्हणजेच यापूर्वी धार्मिक पायावर जगाची अशी वाटणी कोणत्याही धर्माच्या उदयाने झालेली नव्हती. या घटनेमुळे मुसलमान आणि बिगरमुसलमान जनतेच्या मनामध्ये एकामेकांबद्दल एक कायमची अढी निर्माण झालेली आहे. भारताच्या संदर्भातही हेच तत्त्व लागू आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्येच हिंदू-मुस्लीम प्रश्नाचा गुंता निर्माण झाला होता. फाळणीमुळे हा गुंता अधिकच वाढत गेला. व्यवहाराच्या आणि विचाराच्या पातळीवर हा गुंता अनेकांनी सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. १९६० नंतर मुस्लीमविषयक प्रश्नामध्ये बोटावर मोजण्याइतक्या विचारवंतानी हिरिरिने आपली भूमिका मांडली, त्यामध्ये नरहर कुरुंदकर अग्रभागी होते. भाषणांच्या माध्यमातून आणि लेखांच्या माध्यमातून या प्रश्नावर त्यांनी आपली भूमिका विशद केली आहे. 'जागर' आणि 'शिवरात्र' या ग्रंथात ती संकलीत झालेली आहे.

## i) इस्लामचा अन्वयार्थ-

इस्लाम धर्मिय, 'मुहम्मद पैगंबर' हा शेवटचा प्रेषित मानतात व त्याने सांगितलेला 'कुरआन' हा ग्रंथ शेवटचा ईश्वरी संदेश आहे अशी कट्टर भूमिका घेतात. याची चिकित्सा करतांना कुरुंदकर म्हणतात, ''या भूमिकेला 'दिने कामील'ची भूमिका असे म्हणतात. सर्वच प्रेषित इस्लामचे प्रेषित असल्यामुळे ज्यूंची व खिश्चनांची सर्व पूजागृहे आणि त्यांची आदिक्षेत्रे मुसलमानांच्या मालकीची होऊन जातात. मुहम्मद पैगंबर हा शेवटचा प्रेषित असल्यामुळे त्याच्या उदयानंतर होऊन गेलेले ज्ञानेश्वर, शंकराचार्य, रामानुज, वल्लभ हे संत ठरु शकत नाहीत."[२] असा अन्वयार्थ लावतात. हा अन्वयार्थ अधिक टोकदार वाटतो कारण उदारमतवादी मुस्लीम पंडित याचा वेगळ्या दृष्टीने विचार करतात, तो असा,

"या पृथ्वीतलावर कितीही प्रेषित अवतरले तरी अल्लाहचा संदेश एकच होता आणि प्रत्येक प्रेषिताने तोच धर्म आणलेला होता. आणि तोच धर्म म्हणजे इस्लाम होता. त्यामुळे सर्व जगातील सर्व धर्मांचा सर्व प्रेषितांवर समान श्रद्धा ठेवणे प्रत्येक मुस्लीमाला धर्मदृष्ट्या आवश्यक आहे. इस्लाम हा सर्व धर्मसमभावाला मान्यता देणारा धर्म आहे."[३] मात्र कडवे मुस्लीम धर्मपंडित नेहमीच याला विरोध करत आलेले आहेत. आणि अशांची संख्या अधिक असल्यामुळे प्रश्न निर्माण झाले आहेत मात्र विचारी माणसाने समतोलच भूमिका घ्यायला हवी.

इस्लामच्या उदयकाळाला काहीजण त्या काळाचे 'आदर्श सुवर्णयुग' म्हणतात. कुरुंदकर हे नाकारतात. ते म्हणतात, ''तिथे सत्तासंघर्ष तर होताच मात्र गुलामीही होती. इस्लाम स्त्री-पुरुष समानतेबद्दल वाखाणला जातो पण वस्तुस्थितीत इस्लामने स्त्रियांना समानता दिलेली नाही."[४] ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. स्वतः प्रेषितांनीच मेरी नावाच्या दासीशी शरीर संबंध ठेवला होता व त्याचा नातू हसन याने अनेक स्त्रियांशी घटस्फोट घेत सुमारे शंभर लग्न केली होती असा पुरावाही कुरुंदकर देतात. मात्र तत्कालीन इतर समाजव्यवस्थेचा तसेच धर्म व संस्कृतीचा विचार करु जाता तुलनेने इस्लाम हा समतावादी होता असे प्रतिपादन डॉ.रावसाहेब कसबे करतात. यासंदर्भात ते म्हणतात, "इस्लामच्या उदयकाळी त्याच्याभोवती ज्या समाजव्यवस्था होत्या, त्या पूर्णपणे भ्रष्ट अवस्थेत तग धरुन होत्या. इराणमधील उच्चनिचतेवर आधारलेली सामंतशाही, पूर्वेकडील वंशपरंपरागत जाती संस्थेमुळे आणि त्यातही अस्पृश्यतेसारख्या रुढीमुळे मानवजातीला कलंक ठरावी अशी हिंदू परंपरा, पश्चिमेकडील बायसेंटियम आणि लॅटिन युरोप या दोन्हीकडे विशेषाधिकार भोगणारा महाजनांचा वर्ग यांच्याशी तुलना केली तर इस्लमाचे रुप निश्चित समतावादी दिसते. कारण इस्लाममध्ये माणसांचा विचार त्यांच्या जन्मावरुन, संपत्तीवरुन किंवा वंशावरुन केला जात नव्हता, तर तो किती धर्मनिष्ठ आहे आणि गुणवंत यावरुन त्याचा समाजातील दर्जा ठरत असे."[५] नंतरच्या काळात ही परिस्थिती बदललेली आहे. इस्लाम मध्येही उच्चभ्रू तयार झाला, नव्हे जातीही निर्माण झालेल्या आहेत.

'इस्लाम' चा अर्थ परंपरांच्या संदर्भात समजून घेणे कुरुंदकर यांना आवश्यक वाटते, कारण ''धर्माचे स्वरुप एकेरी नसते जे धर्म ग्रंथात सांगितलेले असते ते सगळेच आचरणात नसते. जे आचरणात असते त्याला नेहमी धर्मग्रंथात आधार सापडेलच असे नाही.''[६] म्हणून परंपरा आणि अनुयायांची श्रद्धा नजरेआड करुन चालत नाही असे त्यांना वाटते. संपूर्ण इस्लामिक परंपरा केंद्रस्थानी ठेवून ते अन्वयार्थ लावतात आणि त्यावरुन मुसलमान हे इस्लामव्यतिरिक्त दुसरा कोणताही धर्म, धर्मग्रंथ अथवा ईश्वर मान्य करत नाहीत, या निष्कर्षापर्यंत येतात. या सर्वांवर भारतातील मुस्लिमधर्मवेत्ते म्हणजे मौ.सुलेमान नदवी, पाकिस्तानातील धर्मनेते मौ.मोदुदी व रायबरेली फिरंगी महल, नदवत अल-उलेमा, देवबंद ही मुस्लीम धर्मपीठे यांचे एकमत आहे, अशी पुष्ठीही जोडतात. मात्र स्वतः नरहर कुरुंदकर यांनीच "मौलाना आझाद हे गैरमुकलीद म्हणजे परंपरा मान्य न करता कुराणाचा अर्थ लावणारे थोर विचारवंत होते. त्याचबरोबर मुस्लिम धर्मशास्त्रात परंपरा मान्य करुन इतर ठिकाणी परंपरेला अनुसरुन तर्क करण्याची परवानगी आहे."[७] असे म्हटले आहे. मौलाना आझाद यांचे प्रयत्न हे, इस्लामला त्यातील मूळ गाभा सुरक्षित ठेवून मध्ययुगापेक्षा अनंतपटीनी बदललेल्या आधुनिक वास्तवाशी जोडण्याचे होते. आझादांच्या भूमिकेचे समर्थन करणारा आजही मोठा वर्ग आहे. त्याविषयी रावसाहेब कसबे म्हणतात, ''आजच्या मुस्लीम जगताचा कानोसा घेतला तर मौलानांचीच भूमिका स्वीकारणारे अनेक तरुण आणि तरुणी प्रत्येक देशात सापडू शकतात."[८] केवळ परंपरेने इस्लामचा अन्वयार्थ लावत असताना या दुसऱ्या बाजूकडे कुरुंदकर यांचे दुर्लक्ष होत आहे.

इस्लामाचे तत्त्वज्ञान द्वैताचे तत्त्वज्ञान असल्यामुळे ते जीवनातील नीतीमत्तेचा पायच उद्ध्वस्त करते आणि त्यामुळेच इस्लाममध्ये नीतिमत्तेला स्थान नाही अथवा प्रश्न विचारण्याचाही अधिकार नाही असे सूचवून कुरुंदकरांनी कुराणामधल्या एका प्रश्नाचा संदर्भ दिला आहे. तो असा, ''हे महमंदा परमेश्वराने तुलाच काय म्हणून प्रेषित निवडले? आणि तू प्रेषित आहेस, हे तरी कशावरुन? याचे परमेश्वरीय उत्तर आहे की, ''जा त्यांना सांग, मी परमेश्वराचा प्रेषित आहे. कारण परमेश्वराची इच्छा आहे. प्रेषित कोण हे ठरविणारा परमेश्वर आहे, तुम्ही नाही. आणि त्यांना सांग प्रेषित असल्याचा पुरावा मागणारे तुम्ही कोण? तुम्ही विश्वास ठेवा, आणि शरण या."[९] लोकांनी विचारलेल्या प्रश्नाला प्रेषिताने जे उत्तर दिले आहे त्यावरुन प्रेषित मुहम्मद हुकूमशहासारखा वाटतो. कुरुंदकर यांनी वर दिलेल्या आयतीचा संदर्भ दिलेला नसल्यामुळे ती पडताळून पाहता येत नाही. मात्र कुराणामध्ये अशा असंख्य 'आयाती' आहेत की, ज्यात प्रेषित मुहम्मद यांच्यामध्ये माणूसकी आणि सहृदयता ओतप्रोत भरलेली दिसते. उदा. ही आयत पहा..

.

''माझ्यापाशी अल्लाहचा खजिना आहे किंवा मला परोक्षाचे ज्ञान आहे असे मी तुम्हाला सांगत
नाही. त्याचप्रमाणे मी फरिशता किंवा ईशदूत
असेही सांगत नाही. ज्यांची मला प्रेरणा लाभते तिचेच मी अनुसरण करतो.''[१०]

या आयतीवरुन प्रेषित मुहमदांची भूमिका अगदी स्पष्ट आहे. काही चमत्कार दाखवण्यासाठी नव्हे तर जनतेला व्यावहारीक शिकवण देण्यासाठी ईश्वराने त्यांची नेमणूक केली आहे. रावसाहेब कसबेंनी तर मुहमदाला 'महापुरुष' असे म्हटले आहे. कारण मुहमदांनी टोळी समाजाच्या प्रस्थापीत व्यवस्थेविरोधात बंड विद्रोह करुन नव्या व्यवस्थेच्या निर्मितीसाठी नवीन तत्त्वज्ञान दिले आणि त्याला व्यवहारी रुपही दिले.

इस्लामाची तपासणी करत असतांना कुरुंदकर यांनी 'प्रेषितांच्या' आयुष्यात घडलेल्या अनेक घटनांविषयी आणि 'कुराणाच्या' शुद्धतेविषयीही शंका व्यक्त केली आहे.

यासंदर्भात ते म्हणतात, ''प्रेषितांचा जन्म सहाव्या शतकात झाला, मृत्यू सातव्या शतकात झाला. त्यांच्या जीवनात घडलेल्या घटनांपैकी खऱ्या किती, खोट्या किती, हे सांगणेच फार कठीण. राहता राहिला इस्लामचा पवित्र धर्मग्रंथ कुराण. जगातले सर्व धर्मग्रंथ अशुद्ध आहेत.''[११] महापुरुषांच्या संदर्भात अनेक अख्यायिका निर्माण होत असतात आणि सर्व समाज अतिशय आनंदाने या अख्यायिका रंगवून रंगवून सांगत असतो. धर्मग्रंथाच्या संदर्भातही हेच वास्तव आहे. मात्र कुरुंदकरांचे म्हणणे यापेक्षा वेगळे आहे ते असे 'जगातले सर्व धर्मग्रंथ अशुद्ध असून कुराण तेवढा शुद्ध असे मुस्लीम मानतात. हे अक्षेपार्ह असल्यामुळे कुरुंदकर अतिशय तपशिलात जाऊन सर्व चिकत्सा करतात.

कुराणाचा काही भाग मक्केत असतांना प्रकट झाला आहे तर काही भाग मदिनेत असतांना प्रकट झाला आहे. मात्र कुराणामध्ये या आयती क्रमबद्ध न येता सर्व सरमिसळ झाली आहे. या विसंगतीवर कुरूंदकर नेमकेपणाने बोट ठेवतात. आणि ''इस्लामाच्या धर्मशास्त्राने ज्या आयती मक्केतील ठरवल्या आहेत त्या आधी घेणे व ईश्वराच्या संदेशाचा अनुक्रम लक्षात घेऊन पवित्र कुराणाची नवी रचना करणे ही हिंमत

तेराशे वर्षाच्या परंपरेत फक्त एकच मुस्लीम धर्मपंडिताने दाखविली. तो महापंडित म्हणजे मौ. अब्दुल कलाम आझाद होय."[१२] अशा शब्दात आझाद यांचा गौरव करतात. मात्र आझादांच्या मर्यादाही ते स्पष्टपणे दाखवून देतात. "प्रेषितांच्या मूळचाही अर्थ तेराशे वर्ष जुना झाला आहे! पण त्याच्यापुढे जाण्याची गरज निर्माण झाली आहे, असे मौलानांना वाटले नाही. मौलानांचे सगळे विवेचन सर्व धर्मांना समान न्याय,समान संरक्षण आणि समान गौरव देण्याच्या मर्यादेपर्यंत येऊन थांबले आहे. भारताच्या आधुनिकीकरणाच्या आड व सेक्युलॅझिमच्या आड येणाऱ्या कोट्यावधीच्या धर्मश्रद्धा कोणत्या? या प्रश्नाचे उत्तर मौलानाचे भाष्य देऊ शकत नाही."[१३] इस्लामी संस्कारात माणसाला इतके गौण स्थान दिले आहे की, सारे कर्तृत्व अल्लाकडे दिले आहे. इस्लामच्या धर्मग्रंथाची आणि धर्मशास्त्राची चिकित्सा होण्यात ही सर्वात मोठी अडचण आहे आणि या मर्यादेपासून मौलाना आझादही सुटू शकलेले नाहीत. कारण कुराणाची निर्मिती प्रेषिताने केली आहे अशीच भूमिका आझादानींही घेतली आहे. अशी भूमिका केवळ कुराणाची आहे असे नाही तर वेद मानणाऱ्यांच्या आणि पवित्र पित्याने पुत्राला मानवजातीकडे पाठविले असे म्हणणाऱ्यांच्या भूमिकाही तशाच आहेत. याचा अर्थ कुराणासंदर्भातील मुस्लीमांची भूमिका समर्थनीय आहे असे नाही. मात्र मौलाना आझादांनाही खूप मर्यादा होत्या, याकडे दुर्लक्ष करता येत नाही. मौलाना आझादांनी लिहिलेल्या 'तफसिरूल कुराण' या ग्रंथामुळे कुरुंदकर त्यांना धर्मनिरक्षपतेचे प्रमाणपत्र देतात आणि ते सोडून सर्व मुस्लिमांच्या धर्मनिरपेक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे करतात. ते याप्रमाणे "जगातील प्रत्येक मुसलमान कुराण, हदीस व कुराणाची भाष्यपरंपरा यावर श्रद्धा ठेवतो. अशी श्रद्धा ठेवणारा माणूस लोकशाहीवादी असू शकत नाही, राष्ट्रवादी असू शकत नाही, सेक्युलरही असू शकत नाही. सन्माननीय अपवाद फक्त मौ.आझाद यांचा आहे."[१४] कुरूंदरांची ही भूमिका एकांगी वाटते कारण याच मोजपट्टीने हिंदू, शिख, ख्रिश्चन, जैन आणि बौद्ध या सर्व धर्मातील कोणीही व्यक्ती धर्मनिरपेक्ष ठरू शकणार नाही. कारण धर्माशी निगडित असलेल्या व्यक्तीची त्याच्या धर्माच्या धर्मग्रंथावर श्रद्धा असणारच हे उघड आहे. त्यात कडवेपणा अधिक यायला नको हे महत्त्वाचे आहे. कुरूंदकर मात्र 'प्रत्येक मुसलमान' असा शब्दप्रयोग करतात.

सर्वच धर्मांच्या संदर्भात असे म्हटले जाते की, मूळात कुठलाच धर्म वाईट नसतो तर त्या धर्माचे अनुयायीच त्या धर्माला विकृत रूप देतात. कुरूंदकरांना हे विधान मान्य नाही. ते यासंदर्भात म्हणतात, "धर्म पवित्र आहेत, अनुयायी गोंधळ करतात, पवित्र धर्माला भ्रष्ट करतात, हे पुरेसे खरे नव्हे. काही गोंधळ अनुयायी करतात, पण काही गोंधळ मुळात असतो."[१५] म्हणजे मूळ इस्लाममध्येच गोंधळ आहे असे कुरूंदकर सुचवतात. या गोंधळाच्या काही गोष्टी ते नोंदवतात त्या पुढीलप्रमाणे, "आपलाच धर्म खरा आहे, विरोधकांना तलवारीने गारद करावे, शत्रूंना लुटून गुलाम करावे, त्यांना झिम्मी करावे, अपमानित करावे, त्यांचे पुरूष गुलाम करावे, बायका भोगदासी कराव्यात, दासी किती असाव्यात याला सीमा नाही, दासीचा भोग घेणे याला मनाई नाही. या बाबी धर्मानेच वैध केलेल्या होत्या. त्यांना पवित्र प्रेषित, परमेश्वरी ग्रंथ व पवित्र खलिफा यांच्या वचनांचा व आचरणांचा आधार होता."[१६] मात्र प्रसिद्ध विचारवंत डॉ.रावसाहेब कसबे मात्र मूळ इस्लामचे वर्णन काहिसे वेगळे करतात. ते याप्रमाणे, "इस्लाम हे इतिहासाचे एक आवश्यक अपत्य होते. तेच पुढे दबलेल्या समुहांचे प्रगतीचे साधन बनले. ती एका नव्या समजासंबंधीची तत्त्वप्रणाली म्हणून पुढे आली. त्यानेच मानवी मन क्रांतिकारी बनविले. त्याने कालौघात अधोगतीला गेलेल्या जुन्या संस्कृत्यांची जागा घेतली. परंतु कालौघात इस्लाम सुद्धा ख्रिस्ती आणि हिंदू धर्माप्रमाणेच भ्रष्ट बनला. त्यातही धर्मवेडाने थैमान घातले, कुराणाचा वापर बेजबाबदारीने होऊ लागला."[१७] डॉ. कसबे, कॉ. एम.एन.रॉय यांनी इस्लामच्या ऐतिहासिक योगदानाची चर्चा अतिशय तपशिलात जाऊन केली आहे. ती मूळातून वाचण्यासारखी आहे. प्रेषितांच्या मृत्यूनंतर इस्लाम अपरंपार बदलून गेला नव्हे; त्यानंतर अवघ्या काही दिवसातच एकापाठोपाठ एक अशा चारही खलिफांचे खून झाले आणि इस्लाम दिवसेंदिवस अधिकाधिक कडवा बनत गेला. "मूळ कुराणामध्ये असलेल्या 'सबर' आणि 'हिजर' या दोन सिद्धातांनी इस्लामाला अधिक भयंकर बनवले."[१८] याकडेही कुरुंदकर वाचकांचे लक्ष वेधतात. आपल्या श्रद्धेसाठी नेहमीच बलिदान करण्याची तयारी आणि बिगरमुस्लिम देशात आपल्या मनातील श्रद्धा न सोडता सर्व तडजोडी करून टिकून राहण्याची आज्ञा हे दोन सिद्धांत मुस्लिमांना परवानगी देतात. आज मोठ्या प्रमाणात इस्लामिक दहशतवाद संपूर्ण जगामध्ये वाढलेला आहे, त्याच्या पाठिमागे या दोन सिद्धांताची पार्श्वभूमी आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. इस्लामाची चिकित्सा करता करता त्याचे खलत्व सिद्ध करण्यासाठी कुरूंदकर एकांगी भूमिका घेतात. कशी ते पाहण्यासाठी हे उदाहरण पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, "शांततेशी कसलाच संबंध नसणारा हा धर्म 'इस्लाम' (म्हणजे शांतता) या नावाने ओळखला जातो."[१९] कुरूंदकरांच्या या भूमिकेची चिकित्सा करतांना प्रसिद्ध अभ्यासक वसंत पळशीकर म्हणतात, "शांतीची शिकवण देण्याचा दावा करणारा हा धर्म वास्तविक हिंसेची शिकवण देणारा धर्म आहे. मुसलमान जगाच्या पाठीवर सर्वत्र नेहमीच हिंसेचे उपासक असतात. नेहमीच इतरांचे धर्मांतर, प्रसंगी तलवारीच्या जोरावर सक्तीने करण्याची स्वप्ने बघत असतात. असा ग्रह कुरूंदकर यांच्या लेखनाने निर्माण होतो, मुसलमानांविषयीचा विशिष्ट पूर्वग्रह व अविश्वास बळकट होतो."[२०] स्वतः कुरूंदकर यांचीही भूमिका ठाम दिसत नाही. त्यांच्या लेखनातली विसंगती स्पष्टपणे दिसून येते. ती याप्रमाणे, "आरंभापासूनच इस्लाममध्ये दोन परंपरा होत्या. मक्केत ज्यावेळी धर्मोपदेश सुरू झाला, त्यावेळी वैराग्य व अध्यात्म याला जास्त महत्त्व होते. ही ईश्वरनिष्ठांची, धार्मिकांची परंपरा म्हणजे 'तारिकत' इस्लामचे सर्व संत या परंपरेतून निर्माण होतात. पण इस्लाम हा विजेत्यांचाही धर्म आहे. ही विजेत्यांची परंपरा म्हणजे शरियतची परंपरा."[२१] याच लेखात ते पुढे म्हणतात, या पाच तत्त्वाप्रमाणे (नमाज, रोजा, हज, जकात व पद्धत) इस्लाम धर्माची सरळ सरळ व्याख्या व भूमिका अशी होती की, परमेश्वर एक आहे, सर्वांचा परमेश्वर तोच आहे, त्याची प्रार्थना करावी, त्याचे आभार मानावे, त्याच्या नावे उपवास करावा, मक्का-मदिनेच्या तीर्थयात्रा कराव्या, त्याच्या नावे धार्मिक दान करावे व त्याच्या ऐक्यावर विश्वास ठेवावा."[२२] इस्लामाची मूळ शिकवण कुरूंदकर कबुल करतात त्याप्रमाणे जर आहे तर 'इस्लाम' म्हणजे शांतता हे चूक कसे काय? यासंदर्भात पळशीकर म्हणतात, "इस्लाम हा ईश्वरशरण जीवन शांतीने व्यतीत करा असे सांगणारा धर्म केव्हा राहिला नाही? जेव्हा त्यात सत्तेचे राजकारण शिरले तेव्हा. वरकरणी 'वस्तुनिष्ठ' म्हणता येईल असे कुरूंदकरांचे विधान अर्धसत्य आहे आणि म्हणून ते जास्त दिशाभूल करणारे आहे."[२३] पळशीकर, कुरूंदकरांचे विधान अर्धसत्य यासाठी म्हणत आहेत की,मुहम्मद पैगंबरांच्या हयातीमध्येच त्यात राजकारण घुसले होते व त्यांच्या पश्चात तर हा धर्म अधिकच कडवा बनला हा इतिहास तर सर्वश्रुत आहे.

**ii) इस्लामच्या प्रसाराची कारणमीमांसा:**

इस्लामाच्या प्रसाराविषयीही फार मोठा संभ्रम आहे. कुरूंदकरांचीही यासंदर्भातील भूमिका संभ्रमात भर टाकणारीच आहे. ते म्हणतात, "प्रेषिताने धर्मरक्षणार्थ इ.स. ६२३ ला तलवार हाती घेतली. पुढच्या पासष्ट वर्षात प्रेषितांच्या अनुयायांनी उत्तर आफ्रिका आणि मध्य आशिया म्हणजे त्यावेळच्या ज्ञात जगाच्या जवळपास एक तृतीयांश भाग मुसलमानांनी पुढच्या शंभर वर्षात इस्लाममय करून टाकला."[२४] कुरूंदकरांचा हा निष्कर्ष वस्तुस्थितीला धरून दिसत नाही. यासंदर्भात प्रसिद्ध इतिहासकार गिबन म्हणतात, "सातव्या शतकातील झरत्रुराष्ट्राच्या व्यवस्थेपेक्षा इस्लाम अधिक शुद्ध होता. मोझेसच्या कायद्यापेक्षा त्याचे कायदे अधिक उदार होते आणि गुढवाद, संन्यासाचा अतिरेक आणि विविध अंधश्रद्धात अडकलेल्या ख्रिस्तीधर्मापेक्षा तो बुद्धीच्या कमी विरोधी होता. त्याचे कुराणही साधे सरळ होते. त्यामुळे त्याच्याकडे सामान्य माणसे आकृष्ट होणे साहजिक होते. भारतातील अस्पृश्यता, जातिसंस्था आणि विविध धर्मपंथात चाललेली जीवघेणी स्पर्धा यामुळे इस्लामचा भारतातील प्रवासही निर्धोक बनला होता. त्यामुळे पुढील काळातील इस्लामचा विजय हा जास्त मुसलमानांच्या एकाच परमेश्वरावरील श्रद्धेचा आणि त्याच्याच नावाने लढून भौतिक समृद्धी प्राप्त करण्याचा दुर्दम्य इच्छेचा होता, तसाच तो यहुदी, ख्रिश्चन, झरत्रुष्ट्री आणि हिंदू धर्मात निर्माण झालेल्या कमालीच्या अंधश्रद्धांचा, दारिद्र्य आणि पिळवणूकीचा, आराजक आणि अस्मितेचाही पराभव होता."[२५] इस्लामाच्या वेगाने होणाऱ्या प्रसाराचे आणि त्याच्याबद्दल गोरगरिबांना वाटणाऱ्या आकर्षणाचे एक कारण 'जकात' असल्याचे डॉ.रावसाहेब कसबे सांगतात. तर भारतातील इस्लामाच्या प्रसाराची कारणमीमांसा करतांना स्वामी विवेकानंद म्हणतात, "भारतातील गरिबामधून अनेकजण मुसलमान का झाले? तलवारीच्या जोरावर धर्मांतर झाले असे म्हणणे वेडेपणा ठरेल. जमीनदारांपासून आणि ब्राह्मणी वर्चस्वापासून स्वातंत्र्य मिळण्यासाठी ते मुसलमान झाले."[२६] यावर नेमकेपणाने बोट ठेवतात. नरहर कुरूंदकर या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करतात आणि प्रचारकी थाटात इस्लामच्या प्रसाराची कारणमीमांसा करतात. त्यामुळे हिंदू-मुस्लिमातील दरी कमी न होता ती वाढायलाच मदत होते. कारण पळशीकर म्हणतात त्याप्रमाणे, "जेथे जेथे मुसलमान गेले, तेथे तेथे त्यांनी नेहमीच तलवारीच्या जोरावर धर्मांतर घडवून आणले आणि भविष्यात ते हेच करू इच्छितात, तशी जिद्द ते बाळगून आहेत. असा ग्रह कुरूंदकरांचे लेखन वाचून पक्का होतो."[२७] वस्तुस्थिती निदर्शनास आणून देणे आणि त्यातून भविष्याच्या दिशा निर्देश करणे हे विचारवंताचे काम असते. मात्र कुरुंदकरांच्या लेखनात वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला जाणवतो.

**iii) सेक्युलेरिझम आणि मुस्लिम:**

भारतातील संविधानने धर्मनिरपेक्षता हे तत्व स्वीकारलेले आहे. भारतासारख्या धर्मप्रिय देशाने अशाप्रकारचे संविधान स्वीकारणे याला अनेक अर्थाने महत्त्व आहे. असे असले तरी भारतामध्ये मुस्लिम मूलतत्त्ववाद आणि हिंदू मूलतत्त्ववाद आजही मोठ्या प्रमाणात आपले अस्तित्व टिकवून आहे. कुरूंदकरांनी या दोन्ही मूलतत्त्ववाद्याचा खरपूस समाचार आपल्या लेखनामध्ये घेतलेला आहे. मात्र इस्लामी मूलतत्त्ववाद हा त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. 'सेक्युलॅरिझमच्या या संकल्पनेच्या कसोटीवर ते इस्लामाची चिकित्सा करतात. सेक्युलॅरिझम या इंग्रजी संकल्पनेचा मराठी पर्याय 'धर्मनिरपेक्ष' असा सर्वसाधारणपणे मानला जातो. मात्र सेक्युलॅरिझम या शब्दातील मूळ संकल्पना कुठल्याही शब्दाने निष्पन्न होत नाही असे कुरूंदकरांना वाटत असल्यामुळे ते 'सेक्युलॅरिझम' हाच शब्द सर्वत्र वापरतात मग सेक्युलॅरिझमचा कोणता अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. तर तो याप्रमाणे "कुठलाच धर्म पारलौकिक नसतो. परलोकाच्या नावे चालणारा इहलोकाचा सार्वजनिक व्यवहार ही धर्माची मुख्य कक्षा असते. समाजजीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून धर्म बाजूला सारणे आणि तो केवळ पारलौकिक बाबींसाठी मर्यादित करणे, हा मी सेक्युलॅरिझमचा मुख्य अर्थ मानतो."[२८] कुरूंदकरांच्या व्याख्येनुसार कुठलाच धर्म सेक्युलर असू शकत नाही आणि नसतोही. मग प्रश्न निर्माण होतो तो असा की, धार्मिक माणसे जोपर्यंत धार्मिक आहेत तोपर्यंत सेक्युलर वर्तन करू शकतात का ? किंवा आजच्या भारतातील हिंदू, इसाई, शीख, पारशी, मुस्लिम इ.धार्मिक व्यक्तींचे वर्तन सेक्युलर होण्यासाठी तिने काय करायला पाहिजे? भारतीय संविधानाने समाजजीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून सर्वच धर्म बाजूला सारले असल्याने ती सेक्युलर राज्यघटना आहे. म्हणून उपरोक्त प्रश्नाचे उत्तर वसंत पळशीकर पुढीलप्रमाणे देतात. "हिंदू, मुसलमान वा शीख वा.... अशी स्वतःची ओळख देणारी व्यक्ती जोपर्यंत भारतीय राज्यघटनेशी सुसंगत व भारतातील शासनांनी समंत केलेल्या कायद्यांचे पालन करत असेल तोपर्यंत तिचे वर्तन सेक्युलर आहे असे म्हणता येईल."[२९] आता आपणाला पुढचा प्रश्न उपस्थित करता येईल तो असा सश्रद्ध मुसलमान सेक्युलर वर्तन करू शकतो का? किंवा इस्लामवर ज्याची निष्ठा आहे, तो मनाने कधी सेक्युलॅरिझमचा स्वीकार करू शकतो का? या प्रश्नांना कुरूंदकरांचे काय उत्तर आहे. "भारतीय संविधानाने सार्वभौम अधिसत्ता जनतेच्या नावे जनतेच्या प्रतिनिधीनी सिद्ध होणाऱ्या व घटनेच्या चौकटीत चालणाऱ्या संसदेची अधिसत्ता घेषित केलेली आहे. आणि मुसलमान मात्र परमेश्वराचे सार्वभौमत्व मानतात. मग ते संविधानाशी एकनिष्ठ कसे असू शकतील?"[३०] म्हणजेच भारतीय संविधानाने घेतलेली धर्मविषयक भूमिका नीट समजून घेऊन तिला पाठिंबा देणारे आणि त्यातील कायद्याचे पालन करणारे लोकशाहीवादी, राष्ट्रवादी आणि सेक्युलरही असतात आणि असा पाठिंबा न देणारे लोक कधीच सेक्युलर असू शकणार नाहीत. असाच कुरूंदकरांच्या उपरोक्त विवेचनातून निष्कर्ष निघतो. त्याचबरोबर भारतीय संविधानाने घोषित केलेली सर्व नागरिकांच्या समान नागरिकत्वाची कल्पना हा भारतीय लोकशाहीचाही आणि सेक्युलॅरिझमचाही मूळ आधार आहे आणि बहुतेक नागरिकांनी अजून मोकळ्यामनाने समान नागरिकत्वाच्या कल्पनेचा स्वीकार केलेला नाही. हीच सेक्युलॅरिझमची सर्वात मोठी अडचण आहे."[३१] हे बहुसंख्य नागरिक म्हणजे कोण तर मुसलमान इस्लाम हाच एकमेव परिपूर्ण धर्म आहे असा सिद्धांत मुसलमान मांडत असल्याने कुरूंदकर म्हणतात की, मुसलमान नसणाराशी त्यांना समानत्वाचा संबंध अमान्यच असतात. कुरुंदकर त्यांच्या खास शैलीत हा मुद्दा पुढीलप्रमाणे मांडतात, "तुम्हाला जर तुमचा मुसलमान असल्याचा हक्क प्रामाणिकपणे मान्य असेल तर तेवढ्याच प्रामाणिकपणे माझा मुसलमान नसण्याचा हक्क तुम्ही मान्य केला पाहजि."[३२] केवळ इतकेच म्हणून कुरूंदकर थांबत नाहीत तर पुढे ते म्हणतात, "भारतासारख्या मुसलमान अल्पसंख्या असलेल्या देशात मुसलमानांनी बिगर मुसलमानांचा मुसलमान नसण्याचा हक्क मान्य केला नाही तर मुसलमानांचा मुसलमान असण्याचा हक्क इतर मंडळी सुखाने मान्य करतील अशी अपेक्षा त्यांनी बाळगू नये."[३३] इस्लाम हा परिपूर्ण धर्म मानणे असेल, परमेश्वराचे सार्वभौमत्व मानणे असेल, शरियतच्या कायद्याचा अग्रह असेल अथवा ४४वे कलम भारतीय संविधातून गाळून टाकण्याची भाषा असेल अशा एकांगी भूमिका मुसलमान घेत असल्यामुळे ते सेक्युलर असूच शकत नाहीत अशी स्पष्ट भूमिका कुरूंदकर मांडतात.

राज्यशास्त्राचे अभ्यासक वसंत पळशीकर मात्र याकडे वेगळ्यादृष्टीने पहातात, ते याप्रमाणे, "इस्लाम धर्माचे स्वरूप, सिद्धांत, इस्लामचे संघटन व इतिहास परंपरा आणि मुसलमानांचे सेक्युलर वर्तन किंवा त्यांच्या करवी भारतीय संविधानाचा स्वीकार, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. इस्लाम असा आहे, त्या अर्थी मुसलमान सश्रद्ध धार्मिक असेल तोवर तो सेक्युलर विरोधीच वर्तन करणार व भारतीय राष्ट्र

राज्याला निष्ठा वाहू शकणार नाही, असे म्हणणे गैर आहे. त्याचबरोबर सर्वसामान्य मुसलमान हा धार्मिक असला, त्याची धार्मिक कृती परंपरागत सनातनी असली,तरी त्या कारणाने भारतीय संविधान मान्य करून तो जीवन व्यक्तीत करू शकणार, असे गृहीत धरण्याचे कारण नाही."[३४] खरेतर फाळणीच्यावेळी मुस्लिमांना पर्याय असूनही अनेक जणांनी भारतात राहणे पसंत केले. त्यामुळे भारतीय मुस्लिमांच्या राष्ट्रनिष्ठेबाबत सतत संशय उत्पन्न करणे आणि तुम्ही संविधान निष्ठ आहात का? राष्ट्रनिष्ठ आहात का? असे आपमतलबी प्रश्न विचारणे थांबवले पाहिजे व त्यांना इथे असुरक्षित का वाटते आहे हे समजून घेऊन परस्परांविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण केले पाहिजे असे मोठ्याप्रमाणात झाले तर सेक्युलॅरिझम संदर्भात आणि राष्ट्रीय एकात्मतेसंदर्भातही कोणालाच काळजी करण्याचे कारण असणार नाही.

**सारांश-**

संपूर्ण महाराष्ट्राच्या विचारविश्वात नरहर कुरुंदकर यांच्याविषयी प्रचंड आदर आहे. रोखठोकपणे व स्पष्टवक्तेपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण होते. मात्र ठाम व टोकदार शब्दात विषयाचे प्रतिपादन करण्याच्या विशेषामुळे त्यांचे बहुतांश लेखन एकांगीपणाकडे झुकलेले स्पष्टपणे जाणवते. त्यांचे मुस्लिमविषयक चिंतन याची साक्ष नोंदवता येईल. मुस्लिमांविषयी कडवटपणे बोलणे आणि कडवटपणे लिहिणे हा कुरुंदकरांचा स्वभावधर्म झालेला दिसतो. निजामाच्या राजवटीत राहून काही कडवट अनुभव घेतल्याचाही हा परिणाम असावा. 'शितावरुन भाताची परिक्षा' अशाप्रकारची मोजपट्टी धर्माच्या मूल्यमापनाला लावणे संयुक्तीक ठरत नाही. मुस्लिम हे सेक्युलर असू शकत नाहीत, त्यामुळे ते राष्ट्रवादीही असू शकत नाहीत. मुळ इस्लामातच गोंधळ आहे, त्याचा शांततेशी कसलाही संबंध नाही. अशाप्रकारे टोकदार शब्दात अर्धसत्य मांडल्यामुळे अधिक दिशाभूल होते व समस्या सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीची बनते. नरहर कुरुंदकरांचे एकूण मुस्लिमविषयक चिंतन समस्यांचा गुंता सोडविण्याऐवजी तो गुंता वाढविणारे आणि अधिक दिशाभूल करणारेच आहे.

**संदर्भ टिपा-**

१. कसबे रावसाहेब, धर्मग्रंथ आणि मानवी जीवन प्रवाह, सुगावा, पुणे-२००८, पृ.क्र.२९२
२. कुरूंदकर नरहर, जागर, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, २००८, पृ.क्र.१८६
३. कसबे रावसाहेब, उ.नि., पृ.क्र.३५१
४. कुरूंदकर नरहर, उ.नि., पृ.क्र.१८८
५. कसबे रावसाहेब, उ.नि., पृ.क्र.४००
६. कुरूंदकर नहर, उ.नि., पृ.क्र.१९१
७. कुरूंदकर नरहर, शिवरात्र, देशमुख आणि कंपनी, पुणे,२००१, पृ.क्र.१०९
८. कसबे रावसाहेब, उ.नि., पृ.क्र.४२६
९. जागर, उ.नि., पृ.क्र.१९९
१०. कसबे रावसाहेब, उ.नि.,पृ.क्र.३५२
११. जागार, उ.नि., पृ.क्र.२०१
१२. तत्रैव, पृ.क्र.२०४
१३. तत्रैव, पृ.क्र.२१०
१४. तत्रैव, पृ.क्र.२०५
१५. तत्रैव, पृ.क्र.२१३
१६. तत्रैव, पृ.क्र.२१३
१७. कसबे रावसाहेब, उ.नि., पृक्र.३१०
१८. जागर, उ.नि., पृ.क्र.२००
१९. तत्रैव, पृ.क्र.१५७
२०. पळशीकर वसंत, समाजप्रबोधन पत्रिका, पृ.क्र.६७
२१. जागर, उ.नि., पृ.क्र.१९०
२२. तत्रैव, पृ.क्र.१९२
२३. पळशीकर वसंत, उ.नि., पृ.क्र.६८
२४. जागर, उ.नि., पृ.क्र.१५७
२५. कसबे रावसाहेब, उ.नि., उधृत., पृक्र.३८३
२६. पुनियानी राम, (अनु) प्रदिप देशपांडे, सुगावा, पुणे,२००७, उधृत, पृ.क्र.५९
२७. पळशीकर वसंत, उ.नि., पृ.क्र.६८
२८. जागर, उ.नि., पृ.क्र.१४७
२९. पळशीकर वसंत, उ.नि., पृ.क्र.६४
३०. शिवरात्र, उ.नि.,पृ.क्र.१६३
३१. जागर, उ.नि., पृ.क्र.१५७
३२. शिवरात्र, उ.नि.,पृ.क्र.१५२
३३. शिवरात्र, उ.नि.,पृ.क्र.१५५
३४. पळशीकर वसंत, उ.नि., पृ.क्र.६६



**प्रकाश घनशाम कांबळे**
कला, वाणिज्य व गृहविज्ञान ,महिला महाविद्यालय, जळगाव.